सकाळ : मुंबई
शुक्रवार, ९ जुलै २०१०

# तुषार सावडावकर यांना श्रीलंकेतून पीएच. डी.

मुंबई, ता. ८ : लालबागमधील तुषार सावडावकर यांना 'वास्तू अँण्ड ॲस्ट्रॉलॉजिकल सायन्सेस' या विषयावर पीएच. डी. मिळाली आहे. श्रीलंकेतील मुक्त विद्यापीठामधून त्यांना ही पदवी देण्यात आली आहे. त्यांचा ज्योतिषशास्त्र, वास्तू या विषयावर अभ्यास असून त्यांनी या विषयावर राज्यात व्याख्याने दिली आहेत. कृष्णमूर्ती ज्योतिष पद्धत या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले आहे. 'मानवी जीवनावर ग्रहांचा आणि वास्तूंचा होणारा परिणाम' या विषयावरील संशोधन त्यांनी विद्यापीठाला सादर केले होते.